# —: प्रेसनोट :—

दिनांक :— २१/०५/२०२१

फिर्यादी यांचेवर धारावी पोलीस ठाणे, मुबई येथे दाखल असलेला गु.र.क्र. ३००/२०२१ क. ३५३, ३३२, ३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि. सह ३७ (१)(३), १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा या गुन्हयात अटक करताना आलोसे क्र. १ याने फिर्यादी यांचे अंगझडतीत मिळुन आलेली रोख रक्कम रु. ४०,०००/—, मोबाईल फोन व इतर वस्तु परत करण्यासाठी फिर्यादीकडे रु. १५,०००/— लाचेची मागणी करुन जमा रक्कमेपैकी रु. १५,०००/— स्वतःचे फायदयासाठी काढुन घेतले तसेच आलोसे क्र.२ याने प्रतिबंधक कारवाईमध्ये मदत करण्यासाठी व तडीपार न करण्यासाठी फिर्यादीकडे रु. १२,०००/— लाचेची मागणी करुन तडजोडीअंती सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र.२ याने रु. १०,०००/— लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडण्यात आले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २३/२०२१ |
| कलम | कलम — ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी इसम | १) अमोल पोपट गाडे, वय २७ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, धारावी पो.ठाणे, मुंबई<br>२) प्रभाकर दशरथ जोशी, वय ४४ वर्षे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, धारावी पो. ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | आलोसे क्र.१ याने रु. १५,०००/—<br>आलोस क्र.२ याने रु. १२,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | आलोसे क्र.१ याने रु. १५,०००/— (फिर्यादीचे अंगझडतीतील जमा रक्कमेपैकी काढुन घेतलेली रक्कम)<br>आलोसे क्र.२ याने रु. १०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे खाजगी बांधकाम कॉन्ट्रॅक्टर असुन फिर्यादी यांचेवर धारावी पोलीस ठाणे, मुबई येथे दि. २८/०४/२०२१ रोजी दाखल असलेला गु.र.क्र. ३००/२०२१ क. ३५३, ३३२, ३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि. सह ३७ (१)(३), १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा या गुन्हयात फिर्यादीस अटक करताना आलोसे क्र. १ यांनी फिर्यादीचे अंगझडतीत मिळुन आलेली रोख रक्कम रु. ४०,०००/—, मोबाईल फोन व इतर वस्तु परत करण्यासाठी फिर्यादीकडे रु. १५,०००/— लाचेची मागणी केली.<br>फिर्यादीस आलोसे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. २०/०५/२०२१ रोजी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन दि. २१/०५/२०२१ रोजी पडताळणी करण्यात आली. नमुद पडताळणी दरम्यान आलोसे क्र. १ यांनी फिर्यादीकडे रु. १५,०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलासे क्र. १ यांनी फिर्यादीचे अंगझडतीत केवळ रु. ३०,०००/— मिळाल्याचे फिर्यादीस सांगुन त्यापैकी रु. १५,०००/— स्वतःसाठी काढुन घेवून उर्वरीत रु. १५,०००/— फिर्यादीस परत दिले.<br>त्यानंतर आलोसे क्र. १ यांनी फिर्यादी यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्याकरीता आलोसे क्र.२ याचेकडे हजर केले असता, आलोसे क्र.२ यांनी फिर्यादीस प्रतिबंधक कारवाईमध्ये मदत करण्यासाठी व तडीपार न करण्यासाठी फिर्यादीकडे रु. १२,०००/— लाचेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. त्यानंतर केलेल्या सापळा कारवाई दरम्यान तडजोडीअंती आलोसे क्र.२ याने रु. १०,०००/— लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडण्यात आले म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला. |

( ओबासाहेब पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in, ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप www.acbmaharashtra.net